पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कप्रस/कावि/ ३०६ /२०१३
दि.  ३० / ३ /२०१३

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषय- क प्रभाग समितीची पहिली सभा (विशेष सभा) दि. ५/४/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दि. ५/४/२०१३ रोजी दु. १.०० वाजता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली आहे. प्रस्तूत सभेमध्ये सन २०१३-१४ करीता क प्रभाग समिती अध्यक्षांची निवड होणार आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका व मा.अध्यक्ष निवडीबाबतचे परिपत्रक पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तूत सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक-१

दिनांक- ५ /४ /२०१३ वेळ- दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक ५/४/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्रमांक १) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २९ (४) अन्वये सन २०१३-२०१४ करीता मा. क प्रभाग समिती अध्यक्षांची निवड करणे.

विषय क्रमांक २) मा.क प्रभाग समिती मासिक सभेचा दिवस व वेळ निश्चित करणे.

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख

फक्त सदस्यांकरीता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती कार्यालय
क्र.कप्र/कावि/ ३०७ /२०१३
दिनांक- ३० / ३/२०१३

परिपत्रक

विषय – क प्रभाग समिती सन २०१३-१४ करीता अध्यक्ष पदासाठी
निवडणूक दि. ५ / ४ /२०१३ रोजी दुपारी १.०० वा.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ नुसार महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांची रचना करणेत आली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (४) अन्वये सन २०१३-१४ करीता मा. क प्रभाग समितीच्या अध्यक्षांची निवड करणे आवश्यक आहे. प्रस्तुत निवडणूकीकरिता महाराष्ट्र शासनाकडील क्र. बीएनएम २००८/२९५/ प्र.क्र.१०६/२००८ / नवि-३२ दि. १२ डिसेंबर २००८ अन्वये प्राप्त झालेल्या शासन राजपत्रानुसार राज्याच्या महसुल विभागाचे विभागीय आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त आयुक्त दर्जाचे) हे पिठासीन प्राधिकारी म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रस्तुत अध्यक्ष पदाची निवड ही त्यांचे अधिपत्याखाली होणार आहे. याकरीता मा.विभागीय आयुक्त साहेब, विधानभवन पुणे यांनी आदेश क्र. नपा-१/कावि-९३/२०१३ दि.२८/३/२०१३ अन्वये कळविलेनुसार सदरचा निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे निश्चित करणेत आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नामनिर्देशन पत्रांचे वाटप | : | दि. ०२/०४/२०१३ ते ०३ /०४/२०१३ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत<br>दि. ०४/०४/२०१३ सकाळी ११ ते दु. २.०० पर्यंत<br>(प्रशासन अधिकारी, सभाशाखा क प्रभाग यांचे कार्यालय ) |
| २. | नामनिर्देशन फॉर्म स्विकृती | : | दि. ४ /४/२०१३ रोजी<br>दु. ३ ते ५ वाजेपर्यंत<br>( प्रभाग अधिकारी क प्रभाग यांचे कार्यालय) |
| ३. | अध्यक्ष पदासाठी निवडणूक | : | दि. ५/४/२०१३ रोजी<br>दु. १.०० ते २.०० |
| ४. | निवडणूकीचे ठिकाण | : | पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृह पिंपरी-४११०१८. |

नामनिर्देशन पत्राचे कोरे फॉर्म क प्रभाग कार्यालयात वरीलप्रमाणे दिलेल्या वेळेत मिळतील, नामनिर्देशन पत्र संपुर्णपणे भरुन ते क प्रभाग अधिकारी यांच्या कार्यालयात ठरविलेल्या दिवशी व वेळेत दाखल करावेत.
माननीयांस कळावे.

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती